**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक ३३० वा ● शनिवार २० एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 330 | Date : 20/04/2024 blow Saturday Page 4 Price 4

## मणिपूरमध्ये गोळीबार; ६७ टक्के मतदान





इम्फाळ : मणिपूरमध्ये सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६७.४६ टक्के मतदान झाले. काही ठिकाणी गोळीबार आणि धमकावण्याच्या घटना घडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यातील ६० पैकी ३२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश असलेल्या इनर मणिपूर लोकसभा मतदारसंघात ७१.०१ टक्के मतदानाची नोंद झाली, तर २८ पैकी १५ विधानसभा मतदारसंघ मिळून बनलेल्या आउटर मणिपूर मतदारसंघात ६१.१२ टक्के मतदान झाले.

इनर मणिपूरअंतर्गत येणाऱ्या थौबल जिल्ह्यातील वांगखेम येथे सर्वाधिक ८२.४१ टक्के मतदान नोंदवले गेले. नागा व कुकी अशा दोन्ही समुदायांचे मतदार असलेल्या आउटर मणिपूरमधील चंदेल येथे ८५.५४ टक्के मतदान झाले.

इनर मणिपूर मतदारसंघात अनेक ठिकाणी गोळीबार आणि धमकावण्याच्या घटना घडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. इम्फाळ पूर्व जिल्ह्यात खुराई मतदारसंघातील मोइरांगकाम्पू साजेब । पान २ वर

# ६२.३७ टक्के मतदान; पहिल्या टप्प्यात २०१९ पेक्षा ७ टक्के मतांची घसरण;

**मतदानाचा टक्का (आकडेवारी रात्री ९ वाजेपर्यंत)**

अंदमान-निकोबार- ५६.८७
अरुणाचल प्रदेश- ६७.१५
आसाम- ७२.१०
बिहार-४८.५०
छत्तीसगढ-६३.४१
जम्मू-काश्मीर- ६५.०८
लक्षद्वीप-५९.०२
मध्य प्रदेश-६४.७७
महाराष्ट्र- ५५.३५
मणिपूर-६९.१३
मेघालय- ७४.२१
मिझोराम-५४.२३
नागालँड-५६.९१
पुडुचेरी-७३.५०
राजस्थान-५६.५८
सिक्कीम-६९.४७
तामीळनाडू-६५.१९
त्रिपुरा-८०.१७
उत्तर प्रदेश-५८.४९
उत्तराखंड-५४.०६
पश्चिम बंगाल-७७.५७

नवी दिल्ली : उष्णतेची लाट असूनही शुक्रवारी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ६२.३७ टक्के मतदान झाले. महाराष्ट्रातील पाच मतदारसंघांमध्ये सरासरी ५७.८२ टक्के मतदानाची नोंद झाली. २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये पहिल्या टप्प्यामध्ये ७० टक्के मतदान झाले होते. त्यातुलनेत यावेळी ७ टक्के कमी मतदान झाले.

पश्चिम बंगाल व मणिपूरमध्ये काही ठिकाणे वगळता १९ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशांमधील १०२ लोकसभा मतदारसंघांमध्ये शांततेत मतदान झाले. लोकसभेसह सिक्कीम आणि अरुणाचल राज्यांच्या विधानसभेसाठी मोठया प्रमाणवर मतदान झाल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाकडून देण्यात आली. केंद्रीय निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेल्या शुक्रवारी रात्री ९ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार त्रिपुरामध्ये सर्वाधिक ८०.१७ टक्के मतदान झाले. पश्चिम बंगालमध्ये ७७.५७ टक्के तर, मणिपूरमध्ये ६९.१३ टक्के मतदान झाले. बिहारमध्ये सर्वात कमी ४८.५० टक्के मतदान झाले.

कूचबिहार जिल्ह्यातील सीतलकुचीमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मारहाण केल्याचा व मतदारांना धमकावल्याचा तृणमूलने आरोप केला आहे. मणिपूरमध्ये थामनपोकपी येथील मतदान केंद्राजवळ काही हल्लेखोरांनी गोळीबार केला. इरोइसेम्बा मतदान केंद्रावरही हिंसाचार झाल्याचे समजते.

✻ नितीन गडकरी, किरेन रीरिजू, अनिल बलुनी, भूपेंद्र यादव, अर्जुन मेघवाल, जितेंद्र सिंह, सर्बानंद सोनोवाल आदी केंद्रीय मंत्र्यांसह संजीव बालियान, अन्नामलाई, जितीन प्रसाद आदी भाजप नेते तसेच, राहुल गांधी, कणीमोळी, गौरव गोगोई आदी 'इंडिया'च्या नेत्यांचे राजकीय भवितव्य मतदानयंत्रांमध्ये कैद झाले आहे.

### पंतप्रधानांकडून संतांचं स्मरण

## 'रुप पाहतां लोचनी', वर्ध्यात पंतप्रधान मोदींची अभंगवाणी

वर्धा : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज वर्ध्यात सभा पार पडली. महायुतीचे वर्ध्याचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचाराच्या निमित्ताने मोदींची आज सभा आयोजित करण्यात आली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या आजच्या भाषणाची मराठीत सुरुवात केली. भारत माता की जय अशी घोषणाबाजी करत मोदींनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. त्यानंतर चराचरांत वास करणारी, गुरुदेव शक्ती या सभेला उपस्थित सर्व बंधू-बघिणींना माझा जयगरु, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी मराठीत म्हणाले. यानंतर नरेंद्र मोदी यांनी वर्ध्याच्या भूमीत जन्माला आलेल्या महापुरुषांना नमन केलं. यावेळी त्यांनी पंढरपूरच्या पांडुरंगालादेखील वंदन केलं. मोदींनी पांडुरंगाचं स्मरण करताना 'रुप पाहतां लोचनी' हा अभंग देखील म्हटला.



ही भूमी, अध्यात्म आणि राष्ट्रभक्तीच्या महासंगमची भूमी आहे. इथे अप्रतिम बलिदानांवर वसलेले आष्टी गावची प्रेरणा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज, लालूजी महाराज, संत मायबाई, आडकूजी महाराज असे अनेक किती अगणित महान संतांचे आशीर्वाद या भूमीत मिळतात. मी आज भाग्यशाली आहे की, या भूमीवर मला या सर्व पुण्य । पान २ वर

## हनुमान जन्मोत्सवनिमित्त गौडगांव मारूती मंदिरात धार्मिक कार्यक्रम

### २३ तारखेला रक्तदान शिबिर व शोभ यात्रा

अक्कलकोट/प्रतिनिधी: गौडगांव ( ता.अक्कलकोट) येथील दक्षिण मुखी जागृत मारूती मंदिरात हनुमान जन्मोत्सवनिमित्त२२ २३ तारखेला विविध धार्मिक कार्यक्रम व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हनुमान जन्मोत्सवनिमित्त मारुती मंदीर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व सजावट अंतिम टप्यात असुन अतिशय सुंदररित्या नियोजन केले जात आहे. २२तारखेला भजन,किर्तन, व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.२३तारखेच्या पहाटे ४ वाजता मारुतीस महारूद्राभिषेक,नवग्रह पुजा,



शनिपुजा,होमहवन व यज्ञचा कार्यक्रम पार पडणार आहे.त्यानंतर पाळणा व दर्शनाकरिता आलेल्या भाविकांना हनुमान चाळीसावाचन, १० वाजेनंतर श्रीच्या भव्य पालकी सोहळा तर दुपारी १२ वाजता विशेष महाआरतीचा कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच हनुमान जन्मोत्सवनिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हनुमान जन्मोत्सवनिमित्त मंदीर परिसात अतिशय सुंदररित्या नियोजन केले जात आहे.वर्षभर नवस केलेल्या भक्तांनी,नवस पूर्ण करण्यासाठी उत्सवला मोठी गर्दी केले जाणार आहे.भक्तांना मारूतीचे शुलभ दर्शन मिळावा म्हणुन मंदीर समितीकडून तयारी सुरू आहे.पिण्याच्या पाण्याचे नियोजन स्वच्छतागृहे, भक्तनिवास अशा अनेक भक्तासाठी सूक्ष्म नियोजन केले जात आहे.जन्मोत्सवनिमित्त मारूती अन्नछत्र मंडळात निशार चांदशेख पुणे यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले असुन सकाळी८ते रात्री उशिरापर्यंत महाप्रसाद चालु राहणार आहे.

**हनुमान जन्मोत्सवनिमित्त गौडगाव बुख येथे भव्य कुस्तीचे आयोजन केले असुन इच्छुकानी सहभाग घ्यावे असे अवाहान मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे व कार्याध्यक्ष सिद्राम वाघमोडे यांनी केले आहे.**

**अन्नदानाची व समाजकार्याची मारूतीसेवा आपल्या कृपाशीर्वादाने होत आहे.मारूतीकार्यात मोलाचेसहकार्य करून देणगी रूपाने अन्नछत्र मंडळास आपले आशीर्वाद मिळावेत,अन्नदान सेवेस व चाललेल्या समाजकार्यास सढळ हाताने सहकार्य करुन या मारुतीसेवेत सहभागी व्हावे संपर्क मो.न९४२२४५८९८**

## स्वामी कृपेने लोकसेवेची संधी लाभावी , ओमराजे निंबाळकर यांचे स्वामी समर्थांच्या चरणी साकडे



अक्कलकोट/प्रतिनिधी: श्री स्वामी समर्थांच्या कृपेनेच आपल्या सामाजिक व राजकीय सेवेची वाटचाल चालू आहे. यंदाही लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून स्वामी कृपेने आपल्याला पुन्हा एकदा लोकसेवेची संधी लाभावी याकरिता स्वामी समर्थांच्या चरणी साकडे घालून दर्शन घेतले असल्याचे मनोगत धाराशिव लोकसभा मतदारसंघ महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने । पान २ वर

## दुधनी भीमनगर विज कनेक्शनचे कामे दैनिक यश सिद्धी न्युजच्या दणक्याने एका दिवसात चालु

अक्कलकोट(प्रतिनिधी) अक्कलकोट तालुक्यातील दुधनी (ग्रामीण) भीमनगर या भागात पाच दिवसा पूर्वी अवकाळी वार्या व पावसामुळे खांब पडून वीज कनेक्शन खंडीत झाले होते. रिपाइं च्या जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या बातम्या दैनिक यश सिद्धी न्युज लावले लगेच सकाळी काम चालु करुन आज संध्याकाळ पर्यंत वीजपुरवठा सुरळीत करण्यात आली आहे.त्या बद्दल संपादक, विजमंडळचे अधिकारी,खुशल कर्मचारी आणि भिमनगरातील युवकांचे मनपूर्वक अभिनंदन रिपाइं जिल्ह उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी यांनी केली आहे. येथील नागरीक पाच दिवसापासून अंधारात जिवन जगत होता. विज कनेक्शन नसल्याने लहान मुले,वयस्कर,महिला मच्छर व उकाड्याने अतोनात हाल होत होता. लवकरात लवकर विज कनेक्शन सुरळीत केल्याबद्दल रिपाइं आठवले गट चे जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी व समस्त भीमनगर वाशीयां तर्फे मनपूर्वक अभिनंदन केली आहे. या भागात मोठ्या परवा वादळ व पावसाने विजेचे तीन खांब पडली होती.

## सोलापुरात ४१ तर माढ्यात ४२ उमेदवारी अर्ज

सोलापूर/प्रतिनिधी: सोलापूर राखीव लोकसभेसाठी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत ४१ उमेदवारी अर्ज दाखल केले. तर माढा लोकसभेसाठी एकूण ४२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.शुक्रवारी अखेरच्या दिवशी माढ्यातून २२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यात शिवसेना उध्दव ठकरे गटाचे प्रवक्ते प्रा. लक्ष्मण हाके यांच्यासह शेकापचे ड. सचिन देशमुख यांनी बंडखोरी करून दाखल केलेल्या उमेदवारी अर्जाचा समावेश आहे. या मतदारसंघात भाजपचे खासदर रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे धैर्यशील राजसिंह मोहिते-पाटील यांच्यात विलक्षण चुरशीची आणि प्रतिष्ठेची लढत होणार आहे.

ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासाठी पूरक अर्ज दाखल केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे रमेश बारसकर यांनीही उमेदवारी आर्ज भरला आहे. शुक्रवारी पाचव्या आणि शेवटच्या दिवशी २२उमेदवारांनी अर्ज दाखल केले.तर सोलापूर राखीव लोकसभेसाठी शुक्रवारी अखेरच्या दिवशी १९ उमेदवारांनी अर्ज भरले. काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे व भाजपचे आमदार राम सातपुते या दोन्ही तरूण आणि तगड्या उमेदवारांची चुरशीची लढत अपेक्षित असून त्यांच्याशिवाय वंचित बहुजन आघाडीचे राहुल गायकवाड हे प्रमुख तिसरे उमेदवार आहेत. या मतदारसंघात एकूण ४१ उमेदवार उतरले आहेत. उद्या शनिवारी अर्जांची छाननी होणार आहे. २२ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. ७ मे रोजी मतदान होणार आहे.

## नरेंद्रजी मोदी यांचं खंबीर नेतृत्व ही देशाची गरज : आ. सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधी: सोलापूर लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील वागदरी मध्ये महायुतीचे उमेदवार श्री रामभाऊ सातपुते व लोकप्रिय आमदार श्री सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर सभेचे आयोजन केले होते.यावेळी गावकऱ्यांनी अत्यंत उत्साहाने स्वागत करत लोकसभा विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हाध्यक्ष व अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी जाहीर सभेला मार्गदर्शन करत गावागावांत होत असलेल्या विकासकामांची माहिती दिली. आगामी लोकसभा निवडणूक ही देशासाठी अतिशय महत्त्वाची असून पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांचं खंबीर नेतृत्व ही देशाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर मा. मोदीजींच्या पाठिशी उभे राहण्याचे आवाहन केले. त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत गावकऱ्यांनी भाजपाला साथ देण्याचा संकल्प केला.

सोलापूर मतदारसंघ माझा परिवार असून माझ्या परिवारासाठी मी सदैव उपलब्ध असणार आहे. आज आपल्या सोलापूर मतदारसंघात तरुणांसाठी रोजगार निर्मितीसाठी कंपन्यांना सोलापुरात घेऊन येण्यासाठी माझी प्रमुख भूमिका असणार आहे. तसेच गावागावांत रस्त्यांचा विस्तार आणि पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्राची मदत घेऊन काम करेन असे आश्र्वासन श्री सातपुते यांनी दिले.






आदरणीय पंतप्रधान मोदीजींच्या स्वप्नातील विकसित भारत साकारण्यासाठी सर्वांनी पुन्हा एकदा साथ द्यावी आणि मोठ्या मताधिक्याने मोदी सरकारला निवडून द्यावे असा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी । पान २ वर

# संपादकीय

## इतकी अपेक्षा...

राजकीय व्यभिचाराला कृपा करून राजमान्यता देऊ नका, अन्यथा राजकारणात चुकीचा पायंडा पडेल, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी पाडवा मेळाव्यात हात जोडून मतदारांना केलेले हे आवाहन विचार करायला भाग पाडणारे आहे. पण त्यांचा रोख ज्या राजकीय व्यभिचाराकडे होता त्याच व्यभिचारी लोकांना पाठिंबा देऊन त्यांनी व्यभिचाराच्या डोहात जणू उडीच घेतली. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे दोन तुकडे करून आपली पोळी भाजणाऱ्या राजकीय पक्षाकडे विशेषत: भाजपकडे त्यांचा रोख होता. या गोष्टी राजकारणात सतत होत राहिल्या तर पुढे त्या सवयीच्या होतील. रोजच्या व्यवहारातील त्या एक भाग बनून जातील. त्यातून मतदारांचा लोकशाहीवरील विश्वास उडून जाईल. त्याचा परिणाम मतदानाची संख्या घटण्यातही होऊ शकतो. नीतिमत्ता पाळून राजकारण करावे, असा चांगला संदेश राज ठाकरे यांनी यानिमित्ताने दिला खरा, परंतु पक्ष फोडणाऱ्या व्यभिचाऱ्यांना त्यांनी साथ का दिली, याचे उत्तर मात्र अनुत्तरित राहिले. त्यांच्या अनुयायांनाही याचे उत्तर मिळेनासे झाले आहे. जेथे विचारधारा जुळते तेथे विविध पक्ष एकत्र येत असतात. असे असताना व्यभिचारी वर्तन करणाऱ्या पक्षाशी जुळवून घेताना राज यांना काहीच वाटू नये याचे नवल वाटते. अर्थात राज यांनाच नव्हे तर बहुतांश पक्षांना आणि त्यांच्या नेत्यांना राजकीय व्यभिचार करण्यात काहीही गैर वाटत नाही. पक्ष फोडणे हा असल्या व्यभिचाराचा एक भाग आहेच, शिवाय निवडणुकीच्या प्रचारानिमित्ताने प्रतिस्पर्ध्यांच्या कंबरेखाली वार करण्याचा जो व्यभिचार सध्या रोज ऐकू येत आहे तोदेखील राजकीय संस्कृतीचे अध:पतन करणारा आहे. वाचाळवीरांच्या सवंगपणाला त्यांनी गोळा केलेल्या तरुणाईकडून टाळ्या मिळतीलही, पण त्यातून देशाच्या राजकीय व्यवस्थेतील विकृती दूर करण्यासाठी आवश्यक ती शहाणी सजगता निश्चितच निर्माण होणार नाही. खरेतर राजकारण हे समाजकारणाचे एक माध्यम आहे, ही बाबच वाचाळवीर विसरून जातात. देशात, राज्यात राजकारणात प्रचंड मोठी उलथापालथ होऊन लोकशाही मूल्यांची घसरण होत असताना आपणही त्यात मागे नाही याची पुरेपूर काळजी ही राजकारणी मंडळी घेत असतात. असे वाचाळवीर लोकप्रतिनिधी निवडून दिल्याचा मतदारांना नक्कीच पश्चात्ताप होतो. यंदाच्या निवडणुकीची सुरुवात राज यांनी राजकीय व्यभिचाराचा उल्लेख करून केली. यापुढील काळात तरी अशा व्यभिचाऱ्यांच्या मुसक्या त्यांचाच पक्ष आवळेल इतकी अपेक्षा.

# महिला उद्धारक बाबासाहेब आंबेडकर !

भाग ३

त्यांच्या नादी लागल्यामुळे त्यांना दिवसेंदिवस अधिक बळ मिळत आहे.असो!

महाराज महंतांची एवढी पार्श्र्वभूमी कथन करायचे कारण म्हणजे, विश्र्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू कोड बिल तयार करण्यात अतिशय व्यस्त होते अशावेळी हरिनारायण ओझा उर्फ हरिहरानंद सरस्वती ज्याने काशी क्षेत्रचा धर्मगुरू म्हणून स्वामी करपात्री महाराज या नावाने वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रसिद्धी मिळवली होती. रामराज्य परिषद नावाचा राजकीय पक्ष स्थापन करुन निवडणुकीत तीन खासदार ही त्याने निवडून आणल्यामुळे राजकारणात जो माज येत असतो त्या मस्तीच्या जोशमध्ये येऊन डॉ बाबासाहेब आंबेडकरांना त्या हिंदू कोड बिलासंबंधी चर्चा करण्यासाठी पत्राद्वारे आव्हान दिले.



करपात्री महाराज म्हणाला की, डॉ.आंबेडकर एका अस्पृश्य समाजाचे आहेत. आमचे सगळे धर्मग्रंथ तर संस्कृतमध्ये आहेत. त्यामुळे त्यांना आमचे ग्रंथ आणि शास्त्राबद्दल काय आणि किती माहिती असणार आहे? तरी देखील ते हिंदू कोड बिल तयार करण्यात का रस घेत आहेत ते कळत नाही. जर त्यांनी आमचे शास्त्र आणि संस्कृतीमध्ये दखल घेऊन काही बदल आणि दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.करपात्री महाराज दिल्ली तील यमुना नदीच्या काठावर असलेल्या निगम बोट घाटाजवळील एका आश्रमात रहात होते.एक खास पत्र लिहून हिंदू कोड बिल बाबत चर्चा करण्यासाठी त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आश्रमात येण्याचे निमंत्रण पाठविले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिशय संयमी,शांत आणि सुशील स्वभावाचे होते. त्यांनी त्या निमंत्रणाचा आदरपूर्वक स्वीकार करून महाराजांना कळविले की, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, मराठी अथवा अन्य कुठल्याही भाषेत मी चर्चा करण्यास तयार आहे. जर एखाद्या प्रश्र्नावर आपल्याला चर्चाच करावीशी वाटत असेल आणि काही शंका असतील तर आपण सोयीनुसार माझ्याकडे येऊन आपल्या शंकांचे निरसन करून घेऊ शकता.

हा निरोप कळताच करपात्री महाराजांच्या डोक्याला झिणझिण्या आल्या. महाराजपणाचा मान असल्यामुळे त्यांचा शब्द म्हणजे सर्वांना प्रमाण मानायची प्रथा रूढ करण्यात आल्याने महाराजांना मुबलक माज ही होताच.त्यांना बाबासाहेबांच्या या निरोपाचा खूप राग आला. त्यांनी बाबासाहेबांच्या पत्राला त्वरित उत्तर धाडले.त्या पत्रात त्यांनी बाबासाहेबांना जवळजवळ सूचना वजा धमकीच दिली की, डॉ.आंबेडकर तुम्ही खूप मोठी चूक करत आहात. तुम्हाला कदाचित याचा विसर पडलेला दिसतो की, तुम्ही एक साधू-सन्याशाला तुमच्या कडे येण्यास सांगत आहात.साधूने तुमच्याकडे येऊन नव्हे, तर तुम्ही स्वतः साधू महाराजांकडे येऊन चर्चा केली पाहिजे. आणि असेच करण्याची पद्धत आहे.एवढ्यावरच थांबणारे अथवा हार मानतील तर ते बाबासाहेब कसले ? करपात्रींच्या पत्राला त्यांनी तितक्याच ताकदीने आणि तत्परतेने उत्तरादाखल लिहिले की, मी धर्म, तो मग कुठलाही असो त्यातील धर्मगुरूंना आणि त्यांच्या तप आणि त्यागाचा आदर करतो, वंदन करतो.मात्र आता ज्यांच्याशी माझा जो पत्रव्यवहार सुरू आहे ते आता साधू अथवा महाराज राहिलेच कुठे ? ते तर राजकीय पुढारी झाले आहेत. तसे नसते तर एखाद्या साधू अथवा संन्याशाला हिंदू कोड बिल बद्दल काय देणं घेणं आहे ?

भारतातील सर्वच महिलांना संपत्ती बाळगण्याचा,संपत्तीत वाटा असण्याचा, घटस्फोट मागण्याचा, पुनर्विवाह करण्याचा नैसर्गिक हक्क जर या हिंदू कोड बिलद्वारे मिळत असेल तर यात वाईट काय आहे ? मानवतेला धरून तर आहे. या उलट मला असे वाटते की,या विषयावर आपण गलिच्छ राजकारण करत आहात.आणि राजकीय दृष्टीकोनातून आपल्याला कदाचित विसर पडला असेल की,मी आता या क्षणी स्वतंत्र भारताचा कायदा मंत्री आहे. आणि मंत्री हा शासनाचा एक जबाबदार घटक असल्याने मी मंत्री या नात्याने जिथे आम जनतेच्या हितार्थ कुठलेही कार्य चालत नसेल आणि लोकशाही यंत्रणेचा गळा घोटला जात असेल अशा कुठल्याही ठिकाणी जाणे गैर समजतो.अशामुळे समाजात चुकीचा संदेश जाऊ शकतो.आपल्या पत्राला आंबेडकरांकडून आलेले उत्तर वाचून करपात्रींना आश्र्चर्य आणि अवघड वाटले तरी आपले म्हणजे, एका साधू-महंत महाराजाचे आयुष्यात प्रथमच कोणी तरी ऐकले नाही अशी पराभूत मनोवृत्ती लपवून त्यांनी पत्र लिहून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भेटायला येण्याची तयारी तर दर्शवली परंतु आपल्या उर्वरित हयातीत महाराज एकदाही त्यांना भेटायला गेले नाहीत.त्यांचे धाडस झाले नाही.

आज भारतातील कुठल्याही प्रांतातील कुठल्याही राजकीय पक्षातील इतकेच नव्हे तर डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावावर राजकारण करत आपलं आयुष्य उजळून घेणारा विशेष म्हणजे जगातील एका आदर्शवत संविधानाची शपथ घेऊन संसद आणि विधिमंडळाची पायरी चढणारा एकही पुढारी, मी नेता म्हणत नाही कारण नेता म्हणवून घेण्याची लायकीच आज कुणाजवळ नाही. तर एकही पुढारी असा नाही जो कुण्या महाराजासमोर वाकत नाही.आणि असा एकही महाराज नाही जो पुढा-यांच्या अनैतिक व्यवहाराच्या संबंधात सामिल नाही.

जोपर्यंत धर्म आणि राजकारण ही दोन्ही क्षेत्रं एकमेकांना पूरक उद्योग करत राहतील तोपर्यंत कितीही कायदे केले गेले तरी जनतेचे हित टांगणीलाच राहणार यात यत्किंचितही शंका नसावी.हिंदू कोड बिलच्या माध्यमातून सर्व धर्मीय तमाम भगिनींना माणूस म्हणून जगण्याचा आणि आपले अस्तित्व कायम राखण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व भारतीय महिलांवर जे उपकाराचे कर्ज केले आहे त्याचे व्याज मरेपर्यंत न फिटणारे आहे. याची जाणीव खरचं किती महिलांना आहे ?? हे देखील एक मोठ गूढ आहे.असं जे आचार्य अत्रे म्हणतात ते सदैव संस्मरणीय ठरते. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे सदा सर्वकाळ भारताचे सगळ्यांत महान पुरुष असणार आहेत म्हणून या महामानवाचे आपण तमाम माता भगिनींनी जात-पात,धर्म-पंथ असा भेद न करता कायमच ऋणी असायला हवे.इतकेच !.

**-हेमलता वठारे सदस्या जन लेखक संघ, महाराष्ट्र.**

## स्वामी कृपेने लोकसेवेची संधी ..

समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी ओमराजे निंबाळकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला व आगामी निवडणुकीत निंबाळकर यांच्या यशाबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी बोलताना ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, रामचंद्र समाणे, विपुल जाधव, स्वामीनाथ मुमूडले, प्रसाद सोनार, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.

## नरेंद्रजी मोदी यांचं खंबीर नेतृत्व

भाजप तालुकाध्यक्ष मोतीरामजी राठोड, अप्पू बिराजदार, महेश हिंडोळे, श्रीशैल ठोबरे, शाणप्पा मंगाणे, प्रदीप जगताप ,धोंडपा यमाजी,बसवराज शेळके,सिद्धाराम कलबुर्गी, बसवराज पाटील,हनीफ मुल्ला गुरुजी, सिध्देश्र्वर मठपती, राजकुमार कीवडे,सरपंच सतीश कणमुसे, सौ. वनिता सुरवसे, प्रदीप जगताप, सरपंच श्याम स्वामी, लक्ष्मीबाई पोमाजी, सुनिल सावंत, संतोष पोमाजी, प्रदीप पाटील, प्रकाश पोमाजी, बाळासाहेब भोसले,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, शिवानंद पटणे, रवी राठोड, मल्लिकार्जुन शिदोरे, मल्लिकार्जुन उनादे, वैजिनाथ वर्दे , मल्लिकार्जुन धोंडपा, यामाजी मौला, पठाण इराय्या स्वामी, जयश्रीताई बटगेरी, शैलजा वाडी,दयानंद बिडवे,परमेश्र्वर सावंत, महादेव सोनकवडे, वीरभद्र पुरंत, तसेच ग्रामस्थ व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधानामुळेच देशातील सर्व जाती धर्मातील नागरीक सुरक्षीत असु शकते: मलगाण सर



अक्कलकोट/प्रतिनिधीः भारतीय संविधानामुळेच देशातील सर्व जाती धर्मातील नागरीक सुरक्षीत आहे.असे प्रतिपादन दुधनी जिल्हा परिषद केंद्र शाळेचे मुख्याध्यापक श्री श्री सैल मलगाण यांनी व्यक्त केली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी,कन्नड मुले,मुली व उर्दू शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, समाज सुधारक, महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती आनंदाने उत्साहाने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात प्रारंभी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेची पूजन कन्नड मुली शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवचलप्पा बाबा यांच्या हस्ते करण्यात आला.या वेळी मराठी शाळेचे मुख्याध्यापक श्री मलगाण,रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, शहर अध्यक्ष तथा शा व्य समितीचे अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, उपाध्यक्ष हणमंत कलशेट्टी,सदस्य करबसप्पा अमाणे, सदस्य महेदिमिंया जिडगे, कन्नड शाळेचे महांतेश कर,कोरचकर सर, जोगदे सर,मराठी शाळेचे आदर्श विद्यार्थिनी कुमारी प्राप्ती गंगावती व कन्नड मुले व मुली,उर्दू शाळेचे विद्यार्थ्यांनी यांचे समयोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दुधनी गावचे सुपुत्र व आमच्या सर्वांचे मार्गदर्शक श्री संतोष जोगदे सरांनी केले. शेवटी उपस्थित सर्वांचे श्री कोरचगाव सरांनी आभार मानले. शेवटी सर्व मुलांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## मणिपूरमध्ये गोळीबार;..

येथील एका मतदान केंद्राजवळ उभ्या असलेल्या ६५ वर्षांच्या एका इसमावर अनोळखी सशस्त्र लोकांनी गोळया झाडल्या. यात जखमी झालेल्या या इसमाला रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. बिष्णुपूर जिल्ह्यात मोइरांग विधनसभा मतदारसंघात येणाऱ्या थमनापोक्पी येथील एका मतदान केंद्राजवळ सशस्त्र लोकांनी हवेत गोळीबाराच्या अनेक फैरी झाडल्यामुळे मतदारांना पळून जावे लागले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा कुमक तेथे पाठवण्यात आली. अनोळखी सशस्त्र लोकांनी निरनिराळया ठिकाणी एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या निवडणूक एजंटना धमक्या दिल्या आणि त्यांना मतदान केंद्रातून निघून जायला सांगितले.

## 'रुप पाहतां लोचनी',

आतम्यांना प्रणाम करण्याची संधी मिळाली, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

आज चैत्र एकादशीदेखील आहे. पंढरपूरची आषाढी, कार्तिकी, चैत्र आणि माघी अशा चार यात्रा महत्त्वाच्या असतात. यापैकी आज चैत्र एकादशीची यात्रा आहे. आज प्रत्येक दिशेला गुंजत आहे, रुप पाहतां लोचनीं, सुख जालें वो साजणी, तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा. अशा पुण्यपर्वकाळात भगवान श्री विठ्ठलांच्या चरणी मी शतश: नमन करतो, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

मोदींचं वर्ध्याच्या नागरिकांना आवाहन

मी गुजरातमध्ये जन्माला आलोय. त्यामुळे स्वभाविक आहे, वर्धा आणि अमरावतीशी एक वेगळं नातं असतं. पुज्य बापू गुजराच्या भूमीवर जन्माला आले आणि वर्धा त्यांची कर्मभूमी राहिलेली आहे. विनोबा भावे हे देखील बडोद्यात बरेच वर्ष राहिल्यानंतर इथे वर्ध्यात आले होते. २०२४ ची ही निवडणूक विकसित भारत, आत्मनिर्भर भारतच्या स्वप्नाला पूर्ण करण्याचं स्वप्न आहे. हे स्वप्न देशाच्या स्वातंत्र्याआधी बापूंनी पाहिलं होतं. त्यामुळे देश ज्या दिशेला निर्णायक पाऊल उचलायला जात आहे, त्यामध्ये वर्धाचा विशेष आशीर्वाद पाहिजे, असं आवाहन मोदींनी वर्ध्याच्या नागरिकांना केलं.

# निवडणूक जप्ती व्यवस्थापन प्रणाली विकसित

मुंबई : लोकसभा निवडणुका निर्भिड व निःपक्षपातीपणे पार पाडण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगाची आहे. निवडणुका निःपक्षपातीपणे पार पाडण्याच्या मार्गातील महत्त्वाचा अडथळा म्हणजे काही समाज घटकांकडून मतदारांना देण्यात येणारी विविध आमिषे (उदा. पैसा, मौल्यवान वस्तू, दारु इ.) आहेत. या आमिषांवर प्रतिबंध घालण्यासाठी भारत निवडणूक आयोगाद्वारे विविध उपाययोजना आखल्या असून त्याचाच एक भाग म्हणून भारत निवडणूक आयोगाद्वारे दि.१ डिसेंबर २०२३ च्या पत्राद्वारे दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने राज्यांच्या स्तरावर कार्यरत केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारीतील १९ अंमलबजावणी यंत्रणांच्या प्रत्येकी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची निवडणूक खर्च सनियंत्रण करण्याकरीता समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. याच अनुषंगाने विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे तपासणीकरीता अडविलेला (Intercept) व जप्त (Seizure) केलेला माल यांची त्याच वेळेस नोंद होण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाद्वारे निवडणूक जप्ती व्यवस्थापन प्रणाली (Election Seizure Management System) विकसित केली आहे.

या प्रणालीवर अंमलबजावणी यंत्रणा तसेच जिल्हास्तरावर जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या भरारी पथक व स्थायी देखरेख पथक यांच्याद्वारे अडविलेला (Intercept) व जप्त (Seizure) केलेला माल यांची त्याच वेळेस नोंद करण्याकरीता निवडणूक खर्च राज्यस्तरीय समन्वय अधिकारी नेमण्यात आले आहेत. त्यांच्या माध्यमातून जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या भरारी पथक व स्थायी देखरेख पथक यांना ऑनबोर्ड करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या १६०० हून अधिक फिरती पथके आणि दोन हजारहून अधिक स्थिर पथके कार्यरत आहेत. दि.१ मार्च २०२४ पासून निवडणूक जप्ती व्यवस्थापन प्रणालीवर (Election Seizure Management System) अंमलबजावणी यंत्रणांद्वारे अडविलेला (Intercept) व जप्त (Seizure) केलेला माल यांची त्याच वेळेस नोंद घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

# तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ३६१ उमेदवारांचे ५२२ अर्ज दाखल

मुंबई, : राज्यातील लोकसभा निवडणुक २०२४ च्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मे २०२४ रोजी होणार आहे. यासाठी राज्यातील ११ मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. आज सायंकाळपर्यंत एकूण ३६१ उमेदवारांचे ५२२ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवसापर्यंत रायगड लोकसभा मतदार संघात २८ उमेदवारांचे ४० अर्ज, बारामती - ५१ उमेदवारांचे ६६ अर्ज, उस्मानाबाद - ३६ उमेदवारांचे ७७ अर्ज, लातूर - ३६ उमेदवारांचे ५० अर्ज, सोलापूर - ४१ उमेदवारांचे ५३ अर्ज, माढा - ४२ उमेदवारांचे ५५ अर्ज, सांगली - ३० उमेदवारांचे ३९ अर्ज, सातारा - २४ उमेदवारांचे ३३ अर्ज, रत्नागिरी -सिंधुदुर्ग - ९ उमेदवारांचे १३ अर्ज, कोल्हापूर - २८ उमेदवारांचे ४१ अर्ज आणि हातकणंगले मतदारसंघात ३६ उमेदवारांचे ५५ अर्ज दाखल झाले आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# पडघ्यात महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी

## पुस्तके वाटप करून दिला सामाजिक संदेश



भिवंडी/मिलिंद जाधव :क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती मोठ्या उत्साहाने पडघा केंद्रावर साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पाली भाषा अभ्यासक डॉ. वैशाली महाजन व पडघा ग्रामपंचायत प्रभारी सरपंच शैलेश बिडवी यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्याला आत्मसात करावे लागतील. सर्वांनी एकत्र येऊन चळवळ पुढे नेली पाहिजे असे डॉ. वैशाली महाजन यांनी बोलताना सांगितले.

तर यावेळी पडघा विभागातील सामाजिक कार्यकर्ते, पडघा पोलिस स्टेशन, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य,पोलिस पाटील तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांना क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागाच्या वतीने महामानवांच्या विचारांची पुस्तके देउन सन्मानित करण्यात आले. तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे पोस्टरचे प्रदर्शन लावण्यात आले होते . वैचारिक पद्धतीने विविध पुस्तके वाटप करून सामाजिक संदेश देत संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.

सायंकाळी समतानगर येथून भव्य मिरवणुकीत काढण्यात आली होती. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. फटाक्यांच्या आतिश बाजीने आणि महामानवांच्या जयघोषात पडघा विभाग दुमदुमले होते. तर मिरवणुकीमध्ये ब्रीझ्स ब्रेकर्स डान्स स्टुडिओ पडघा मधील मुलांनी नृत्य सादर करीत प्रेक्षकांचे मने जिंकली. मिरवणुकीत पडघा विभागातील विविध क्षेत्रातील नागरिक सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागातील तरुण कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# शेतकरी अडचणीत असताना भाजपने त्यांच्याकडे पाठ फिरवली : आ.प्रीती शिंदे

पंढरपूर/प्रतिनिधीः शेतकऱ्यांचा मताचा फायदा घेऊन भाजप सत्तेत आले आणि आता जेव्हा शेतकरी अडचणीत येतात येत आहेत त्यावेळी त्यांच्याकडे भाजपने पाठ फिरवली असल्याची टीका महाविकास आघाडीचे सोलापूर लोकसभा उमेदवार आमदार फनीती शिंदे यांनी केली आहे तर मागच्या दहा वर्षात सोलापूरकरांच्या विश्र्वासघात झाला असून मागच्या दहा वर्षात सोलापूर ऊस पडले असले की टीका यावेळी आमदार प्रणिती शिंदे



आमदार प्रणिती शिंदे यांनी आज शुक्रवार दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी फुलचिंचोली मगरवाडी तारापूर गुरसाळे बोरगाव विटे अंबा चिंचोली शंकरराव या गावाचा दौरा केला यावेळी बोलताना पनीती शिंदे यांनी दहा वर्षात भाजपने शेतकऱ्याची फसवणूक केली असलेली टीका केली महागाईने जनता तरच झाली आहे चारशे रुपये गॅस बाराशे रुपये झाला आहे प्रत्येक शेतकऱ्याच्या मालाला भाऊ नाही त्यामुळे माझ्या देशात मत मागणे हा नाही तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेण्यासाठी हा गाव भेट दौरा असून त्याला नागरिकांतूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे मत माहीतीचे उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनी मांडले


भाजप अडचणीत असताना कधी जाऊन आला नाही परंतु आता मते मागण्यासाठी फिरत आहेत परंतु जनता भाजपवर चांगलीच वैतागली आहे दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाहून त्यांचे उमेदवार निवडून दिले परंतु आता त्यांची ती ग्रेट संपली आहे त्यामुळे भाजपचा पराभव हा निश्र्चित असल्याचे सांगत मागील दहा वर्षात भाजपने सोलापूर लोकसभा मतदारसंघात दोन्ही निष्क्रिय खासदार दिले आताची लोकसभा निवडणूक ही पुढाऱ्यांची नसून पुढारी विरुद्ध जनता अशीच आहे या भाषणात मोठे बोलतात हायवे केले मोठे मोठे रस्ते केले परंतु तुम्ही ग्रामीण भागात आल्यानंतर तुम्हाला आता तरी रस्ते चांगले आहेत का असा संतप्त सवाल यावेळी पण ती शिंदे यांनी केला यावेळी त्यांनी जीएसटी रद्द करण्याची मागणी केली ही निवडणूक माझी नसून जनतेची निवडणूक असलेली सांगत खूप खूप चिंचोली क्रांतिकारी गाव आहे या गावातून पंढरपूर तालुक्यातील सर्व गावातून शिंदे साहेबांना चांगले मते मताधिके मिळाले होते यावर्षी चांगले मताधिक द्या असे आव्हान यावेळी आमदार पनीती शिंदे यांनी केले आहे

**मतभेद विसरून मताधिक्य द्या,– भगीरथ भालके**

आता ते सरकार हे प्रश्र्नाचे जाण नसणारे सरकार आहे आरक्षणाच्या नावाखाली जाती-जातीमध्ये घराघरांमध्ये भांडी लावण्याचे काम हे सरकार करत आहे मागील दहा वर्षापासून या सरकारने शेतकऱ्याचे सहसामान्य जनतेला फसवण्याचे काम केले गेल्या दहा वर्षात निवडून आलेली भाजप खासदार शेतकऱ्यांच्या अडचणीवर बोलायला तयार नाहीत सध्या शेतकऱ्याकडे पाणी आहे मात्र वीज नाही फक्त कागदावरती सात असते आठ तास वीज आहे प्रत्यक्षात मात्र वीज नाही त्यामुळे आता लोकसभेत आपल्याला प्रणिती शिंदे यांना निवडून द्यायचे आहे तरी आपसापसातील वाद मिटवून त्यांना कसे मताधिके देता येईल याकडे लक्ष द्या सर्व गट तट विसरून काम करा असे आव्हान यावेळी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा नेते भगीरथ भालके यांनी केली

# बासलेगाव येथे श्री भवानी देवीच्या यात्रेनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

अक्कलकोट/प्रतिनिधीः बासलेगाव (ता. अक्कलकोट)येथे सालाबाद प्रमाणे यंदाही दि.२२ ते दि.२४ एप्रिल रोजी श्री भवानी देवीच्या यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलयाची माहिती देवस्थान कमिटीचे अध्यक्ष शंकरराव सुरवसे यांनी दिली आहे. सदरील यात्रा



चैत्र शुद्ध पौर्णिमेला दि.२२ ते दि.२४ एप्रिल २०२४ विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये सोमवार दि.२२ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ७ते रात्र १२ पर्यंत गोंधळ कार्यक्रम,तर मंगळवार दि.२३ एप्रिल २०२४ रोजी रात्रौ ८:३० वाजता डोंगर लोटांगण, रात्रौ १०:०० वाजता उत्तमर मनीतन अर्थात धर्मवंतरू कन्नड सामाजिक नाटक व बुधवार दि.२४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ८ ते १२ दरम्यान देवीची महाआरती दुपारी ४ वाजता मल्लांची जंगी कुस्ती रात्रौ १० वाजता उत्तमर मनी तन अर्थात धर्मवंतरू कन्नड सामाजिक नाटक असे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून अक्कलकोट तालुक्यातील श्री भवानी मातेच्या भक्तांनी या कार्यक्रमाचे मोठ्या संख्येने लाभ घ्यावा अशी आव्हान श्री भवानी देवी यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आला आहे.

# रूपाली ठाकूर यांची नियुक्ती

पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता ४३ माढा लोकसभा मतदारसंघासाठी भारत निवडणूक आयोगाकडून जनरल निवडणूक निरीक्षक म्हणून रूपाली ठाकूर (भा. प्रो.से) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.जनरल निवडणूक निरीक्षक रूपाली ठाकूर (भा. प्र.स.) यांचे कार्यालय चित्रा शासकीय विश्राम वेळेस सोलापूर या ठिकाणी असून निवडणुकीच्या अनुषंगाने कोणत्याही कोणालाही भेटावयाचे अथवा कोणतीही माहिती घ्यावयाची असल्यास सामान्य निवडणूक निरीक्षक हे मतदारसंघाच्या दौऱ्यावर नसताना सकाळी ११:३० ते १२:३० यावेळी चित्रा शासकीय विश्राम गरज सात रस्ता सोलापूर येथे भेटीसाठी उपलब्ध होतील तसेच त्यांचे संपर्क क्रमांक ८४६८९६३४१८ हा असून सदर क्रमांकावर भ्रमणध्वनी अथवा व्हाट्सअप वर संवेदनद्वारे संपर्क साता येईल असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी यांनी कळविले आहे

# वारकरी भाविक भक्तांनच्या सेवेसाठी थंडगार रसासरबचते वाटप

पंढरपूर/प्रतिनिधीः चैत्री वारीच्या कामदा एकादशी निमित्त भाविक भक्तांना थंडगार रसना सरबत चे वाटप करण्यात आले.

वाढता उन्हाळा व घशाला पडणारी कोरड अशा या कडक उन्हात भाविक भक्त पंढरपुरात मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत या प्रचंड उन्हामध्ये पाई चालत श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना आज पंढरपूर शहर व तालुक्यातील चालक-मालक बांधवांच्या सहकार्यातून वारकरी भाविक भक्तांना थंडगार रसना सरबत चे आज वाटप करण्यात आल.

यावेळी अनेक भाविकांनी या थंडगार सरबत ला लाभ घेत असताना चालक मालकांनी मिळून केलेल्या कार्याचे कौतुक करत आपल्या हातून गोरगरिबांची भावीक भक्तांची अशीच सेवा घडो असे अनेक वारकरी भक्तांनी आशीर्वाद दिले हा सामाजिक कार्यक्रम



पार पाडण्यासाठी अतोनात परिश्रम घेतलेले. सागर चव्हाण, गणेश जाधव, अशपाक भालदार, ऋषिकेश शिरसागर, सचिन गोडसे, मुकुंद लोहार, उत्तम सोनवणे, सतीश मामा बंगाळे, रविकांत कुर्नावळ, इम्रान बागवान, सुरेश ढेरे, सोहेल काझी, लक्ष्मण आलदार , नितीन नागटिळक, गुरु महाराज नवाळे ,नागेश देशमुख, प्रशांत अवघडे ,शिवरुद्र चव्हाण, सोपान काका देशमुख व इतर चालक मालक बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# इंदापूर मार्गे पंढरपूर– पुणे १२ बस सुरू; ग्राहक पंचायतीचे मागणीला रा.प.महामंडळाचा सकारात्मक प्रतिसाद

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्य परिवहन महामंडळामार्फत इंदापूर मार्गे पंढरपूर- पुणे(स्वारगेट) बसगाड्या सुरू केल्याचे पंढरपूर आगार प्रमुख मोहन वाकळे यांनी कळविले असल्याची माहिती अ. भा ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

मोठ्या संख्येने पंढरपूर- पुणे या बसेस फलटण मार्गे धावतात. अनेक ठिकाणी रस्त्याची कामे सुरू असल्याने प्रवासासाठी विलंब होत होता. त्यामुळे प्रवासी संख्येत घट होत होती. पहाटेपासून अनेक खाजगी बसेस इंदापूर मार्गे पुणे अशा धावत आहेत. त्यास प्रवाशांचा मिळणारा प्रतिसाद पाहताराज्य परिवहन महामंडळानेही बसेस इंदापूर मार्गे राष्ट्रीय महामार्गावरुन पुण्यासाठी सोडाव्यात अशी मागणी अनेक दिवसांपासून अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे करण्यात येत होती.

त्याप्रमाणे विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांनी मागणीची दखल घेऊन पंढरपूर येथून पहाटे ५-४५ पासून दुपारी ३ वाजेपर्यत १२बसेस व परतीच्या प्रवासासाठी स्वारगेट येथून पहाटे ५ पासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत १२ बसेस सुरू झालेल्या आहेत. या बसेस चारच थांबे घेऊन पाच तासामध्ये हा प्रवास पूर्ण करणार असून यामध्ये प्रवाशांना सर्व प्रकारच्या सवलती मिळणार आहेत. तरी जास्तीत जास्त प्रवाशांनी या सुरक्षित सेवेला प्रतिसाद द्यावा असे आवाहन प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते,सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, सचिव सुहास निकते, तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये,संघटक महेश भोसले, उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सचिव प्रा. धनंजय पंधे, यांनी केले आहे.



# रेणुका कॉलेज मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

रेणापूरः १४/४/२०२४ रोजी रेणुका एज्युकेशन सोसायटी रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर, ता रेणापूर, जि, लातूर, येथे महामानव, विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ कैलास मोटे, यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.या वेळेस प्रा. शशिकांत चीलरगे , डॉ हिरकन शेटकर, प्रा रतन लहाने, IQ-C समन्वयक प्रा. उमेश रणदिवे,प्रा रमाकांत गायकवाड, प्रा. राधिका माने ,ग्रंथपाल मनीषा लातूरकर चंद्रकांत आडे,श्री संतोष पवार. व ईतर शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# खाणपट्टा क्षेत्र बनले प्रदूषणाचे केंद्र; प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियम व अटींना फाट्यावरच ठेवले

मंगरूळपीर/गौरवकुमार इंगळे : अलिकडील काही वर्षांमध्ये बांधकाम क्षेत्र वेगाने विकसित होत आहेत. रेतीचे वाढते दर आणि कमी उपलब्धता मुळे रेतीला पर्याय म्हणुन क्रश सँड चा वापर मोठया प्रमाणात करण्यात येत आहे. खाणपट्टा धारकांकडून चूरी, डब्बर, गीट्टी, क्रश पावडर या सारखे उत्पादने काढली जातात. परंतू हे करत असताना महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून विहित केलेल्या नियम व अटी चे पालन करणे बंधनकारक असते. जेणेकरून सदर उत्पादने काढण्याच्या प्रक्रियेमध्ये पर्यावरणाची झालेली हानी भरून निघेल. त्यामध्ये खनिपट्टाधारकांकडून जास्तीत जास्त झाडे लावणे गरजेचे आहे.

सदर खाणींमध्ये उत्खनन सुरू असताना प्रचंड मोठ्या प्रमाणात धुळीचे कण हवेमध्ये पसरतात यासाठी सुद्धा प्रदूषण नियंत्रण मंडळाने काही नियम घालून दिले आहे ज्यामध्ये त्या ठिकाणी स्प्रिंकलर द्वारे फवारणी करणे आवश्यक असते जेणेकरून धुळीचे कणांमुळे हवेची गुणवत्ता ढासाळू नये. परंतु याही नियमाला बगल देत खाणपट्टा धारक प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियम व अटींना फाट्यावर मारण्याचा प्रताप अनेक वर्षापासून करत आहे. हवेची गुणवत्ता चांगली आहे याची शाश्र्वती खणीपट्टा धारकांना एका विशिष्ट कालावधीनंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाला देणे बंधनकारक आहे परंतु जेथे धुळीचे साम्राज्य आहे तिथे हवेचे गुणवत्ता चांगली राहणार तरी कशी.

मुळात पर्यावरणाच्या होणाऱ्या हानीचे ना तर खाणपट्टा धारकांना काही देणे घेणे आहे ना तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला असे असते तर प्रदूषण नियंत्रण मंडळाने विहित करून दिलेल्या अनेक नियम व अटी पैकी काही महत्वाच्या नियम व अटींचे तरी पालन झालेच असते. सदर खाणीमधून शहराच्या मार्गे गौण खनिजाची वाहतूक करत असताना खऱ्या अर्थाने सदर वाहनाला झाकून ठेवणे गरजेचे आहे जेणेकरून त्यातील गौण खनिज जसे की चूरी, गीट्टी रस्त्यावर पडून वाहन चालकाच्या अपघाताची शक्यता वाढू नये. परंतु राजरोसपणे कुठलीही भीती न बाळगता संपूर्ण रस्त्यावर चुरी सांडवत सदर वाहने दिवसभर ये जा करत असतात.जागतिक तापमानामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.जलवायू परिवर्तन सारख्या समस्या जगासमोर उभे आहेत अशांमध्ये प्रत्येक यंत्रणेला आखून दिलेली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडल्या गेली पाहिजे. प्रत्यक्षात मात्र महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून या नियम व अटी काटेकोरपणे राबवल्या जात असल्याचे दिसत नाही. त्यामुळे खणीपट्टा धारक क्षेत्र खऱ्या अर्थाने प्रदूषणाचे केंद्र बनल्याचे दिसून येत आहे.

# विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याचे शिक्षकांचे कार्य महान : माजी उप सभापती सौ सोनाबाई आलुरे

अक्कलकोट/महेश गायकवाड :विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याचे शिक्षकांचे कार्य महान आहे शिक्षक हे उद्याचे भावी नागरीक घडविण्याचे काम करत असतात असे प्रतिपादन अक्कलकोट पंचायत समितीच्या माजी उपसभापती सौ सोनाबाई आलुरे यांनी केले. घोळसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या. अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गट शिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे हे उपस्थित होते. तर विस्तार अधिकारी दयानंद कवडे, बापूराव चव्हाण, केंद्रप्रमुख श्री बसवराज मुनोळी केंद्रप्रमुख वागदरी श्री शिवशंकर त्रिगुळे पत्रकार व श्री विश्र्वास सोनवणे टाटा पॉवरचे अधिकारी उपस्थित होते.घोळसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन १६ एप्रिल रोजी सायंकाळी श्री शंभू महादेव यात्रेनिमित्त अति उत्साहात पार पडले . शाळेच्या मुलांच्या विविध गुण दर्शनाचा कार्यक्रम पाहण्यासाठी गावातील बहुसंख्य नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. प्रेक्षकांच्या गर्दीने महादेव मंदिराचे पूर्ण पटांगण भरलेले होते, कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी अक्कलकोट पंचायत समितीच्या माजी उप सभापती सौ सोनाबाई इराण्णा आलुरे या होत्या . कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्या सौ पार्वती नागेश पालापुरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. तर प्रतिमा पूजन सरपंच राजशेकर किवडे व संजय होळे यांचे हस्ते करण्यात आले. स्टेज पूजन मल्लिनाथ हापाळे व मल्लिकार्जुन गौरकर यांच्या हस्ते झाले . संगीत पूजन महांतेश्र्वर कोतले व मल्लिनाथ सोळशे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम चे दीपप्रज्वलन सौ जयश्री दिलीप पाटील श्री प्रशांत पटणे सर श्री याकूब मुल्ला, आणि बालाजी कांबळे श्री प्रदीप कोतले श्री खंडेराव साळुंखे या सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विशेष म्हणजे पहिली ते सातवी सात वर्ग आणि चार शिक्षक अवघ्या दहा दिवसांमध्ये मुलांना शिकवत परीक्षा घेत अतिशय सुंदर असे विविध गाणे व नाट्य बसविलेले होते. श्री सोमनाथ मोरे सर श्री रामेश्र्वर दरेकर सर श्री अमोल गुंजोटी सर

## या वार्षिक स्नेह संमेलनात

विविध मनोरंजक गाणी लोकगीते, देशभक्तीपर गीते, समाजप्रबोधन पर नाटके, लोकनृत्य, विठ्ठल गीते,धार्मिक व सामाजिक गीते,अशा विविध गाण्यांच्या व नृत्य प्रकारावर विद्यार्थ्यांनी आपापले कलाविष्कार सादर केले. आमच्या पप्पांनी आणला गणपती , माऊली माऊली ..... यासह नऊ वारी साडी पाहिजे, हुंडा नको मामा मला पोरगी द्या, शेतकरी आत्महत्या, मुक नाटक यासह टिपरी हलगी व लेझीम गीत असे विविध प्रकारचे भरगच्च कार्यक्रम या स्नेह संमेलनात पार पडले.




श्री अजित ठाकूर सर व श्रीमती प्रतिक्षा डाळे मॅडम यांनी अतिश्रम परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी श्री दिलीप पाटील श्री मल्लिकार्जुन आलुरे श्री राजेंद्र काळे सतीश पालापुरे राजेंद्र समन मल्लिनाथ हडपद , आरिफ दिवटे, विजयकुमार पाटील उमेश साळुंखे अल्ताफ फकीर परमेश्र्वर आलूरे अमोल पाटील अब्दुल मकानदार नर्सिंग काळे, सोमनाथ बादोले असे अनेक गावातील नागरिक सहकार्य केले विशेष म्हणजे स्टेज वरती अंगणवाडी सेविका बचत गट सीआरपी उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित असलेले सर्व मान्यवर व माजी विद्यार्थी यांचा ही यावेळी सत्कार करण्यात आला .तसेच श्री आर बाळे सर व श्री बापूराव चव्हाण यांनी मार्गदर्शन केले व तसेच माजी विद्यार्थ्यांमधून मल्लिनाथ सोळसे इंजिनियर व सरकारी वकील याकूब मुल्ला यांनी आपले मनोगत व्यक्त केले याप्रसंगी उमेश साळुंखे व गावातली सर्व नागरीक आणि विविध मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बार्टी पुणे आणि लर्नेट स्किल लिमिटेडच्या माध्यमातुन महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील ६० उमेदवारांना कौशल्य विकास उपक्रमांतरागत प्रत्यक्ष ट्रेनिंग व ऑन-द -जॉब ट्रेनिंग

पुणेः बार्टी व लर्नेट स्किल लिमिटेडच्या माध्यमातुन अनुसूचित जाती मधील उमेदवारांना ३ दिवसीय मोफत कौशल्या विकासाचे प्रशिक्षण भोसरी पुणे येथे देण्यात आले.बार्टी चे महासंचालक श्री.सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडला. दि. ०६ /०४/२०२४ ते ०८ /०४ /२०२४ रोजी ऑटोमोटिव सेल्स असिस्टंट प्रशिक्षण कार्यक्रमचे बुटकॅम्प आयोजित करण्यात आलेला होता. त्यामार्फत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातील पात्र उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले.

बुटकॅम्पव्दारे महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील एकुण ६० पात्र प्रशिक्षणार्थींची पुढील ३ महिन्याचे प्रत्यक्ष ट्रेनिंग (ऑन-द -जॉब ट्रेनिंग जगढ) यासाठी निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेले प्रशिक्षणार्थी प्रामाणिकपणे कौशल्य विषयक प्रशिक्षण घेतील व त्या माध्यमातून त्यांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतील. याकरिता या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात आला.. या कार्यक्रमाची सांगता समारंभासाठी माननीय विभाग प्रमुख कौशल्य विकास विभाग श्री.अनिल कारंडे , कार्यालय श्रीमती.अधीक्षक प्रज्ञा मोहिते ,प्रकल्प व्यवस्थापक श्री.महेश गवई ,पशुसंवर्धन विभागाचे श्री. राजेश खंदारे , लर्निंग स्किल लिमिटेड प्रादेशिक प्रमुख श्री.सुनील जोसेफ ,कार्यक्रम प्रमुख श्री.ऋषिकेश शेडगे उपस्थित होते. बार्टी च्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या विकासासाठी राबवल्या जात असलेल्या विविध कौशल्य विकास योजनांचा व उपक्रमांचा लाभ समाजातील युवक-युवतींनी जास्तीत जास्त घ्यावा, असे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनिल वारे यांनी केले आहे.

# ख्वॉजा पिर सैपन मुलक दर्गाह कार्यकारणीची निवड जाहीर

## चेअरमनपदी रफिक मुजावर तर व्हा चेअरमन बंदेनवाज मुजावर



ख्वॉजा पिर सैपन मुलक दर्ग्याच्या दर्शनासाठी महाराष्ट्र राज्यासह देशभरातून भक्ताची वर्दळ असते. भक्तांच्या अडीअडचणी जाणून घेऊन ती सोडवून करणार सर्व सोय सुविधेवर भर देणार,तसेच सर्वांना विश्र्वासात घेऊन दर्ग्याचे कामकाज करणार, **– रफिक मुजावर,चेअरमन ख्वॉजा पिर सैपन मुलक दर्गाह हैद्रा अक्कलकोट**

अक्कलकोट/प्रतिनिधीः हैद्रा येथील ख्वॉजा पिर सैपन मुलक दर्गाह कार्यकारणी निवडीची बैठक नुकतेच पार पडली. माजी चेअरमन मिरासाब याकुबसाब मुजावर यांच्या अध्यक्षतेखाली नुतन चेअरमन रफिक मुजावर तर व्हा चेअरमन पदासाठी बंदेनवाज मुजावर यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या वतीने नूतन चेअरमन रफिक मुजावर व्हा.चेअरमन बेदनवाज मुजावर यांचा सत्कार करण्यात आले.नूतन कार्यकारणी चेअरमन रफिक मुजावर व्हा. चेअरमन बंदेनवाज तालाबली मुजावर,सेक्रेटरी वकील नबीसो मुजावर,मुतवली अहमद कादरबाशा मुजावर, सदस्य अ. रऊफ कादरसाब मुजावर, बंदेनवाज, शिराजोदीन मुजावर,याकुबसाब मुजावर या सर्वांची निवड करण्यात आली.

यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष मलकप्पा कोगनुरे, मुस्लिम समाज अध्यक्ष सैपन फुलारी, तंटामुक्त अध्यक्ष चंद्रशेखर करोटी,मंजुनांथ तेली, पोलीस पाटील श्रीशैल कोगनुरे,जैनुद्दीन मुजावर, आयुब मुजावर,अब्बासली मुजावर,प्रकाश बिराजदार,सागर कोरोटी,मंजू रोगडी,हजरत फुलारी,वसीम मुजावर आदी उपस्थित होते.

# खरीप हंगाम पूर्वनियोजित आढावा बैठक



पंढरपूर/प्रतिनिधीः आज रोजी दिनांक १९/४/२०/२०२४ रोजी खरीप हंगाम पूर्व नियोजन आढावा बैठक उपविभागीय अधिकारी श्री सचिन इथापे. उपविभागीय कृषी अधिकारी श्री बाळासाहेब लांडगे. तहसीलदार सचिन लंगोटे मा. कृषी अधिकारी सूर्यकांत मोरे. गटविकास अधिकारी श्री सुशील संसारे कृषी अधिकारी पंचायत

समिती श्री विकास काळुंखे तंत्र कृषी अधिकारी श्री विकास मेंढे श्रीमती खरात मॅडम सुमित यलमार तुंगत सचिन जाधव करकम सुहास यादव कृषी प्रवेशक सर्व तसेच कृषी सेवा केंद्र विक्री ताई संघटनेच्या पंढरपूर विक्रेते इत्यादी सर्व उपस्थित होते

यावेळी प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी पंढरपूर श्री सूर्यकांत मोरे साहेब यांनी केले प्रेझेंटेशन पंचायत समिती कृषी अधिकारी विकास काळुंखे यांनी सादर केले यावेळी कृषी विभागातील सर्व योजनांची माहिती सांगण्यात आली

# नळदुर्ग शिवारात विज पडुन दोन बैलाची मृत्यू

## शासनाने पिडीत महिला शेतकऱ्यांना पंचनामा करून तात्काळ मदत द्यावी

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :नळदुर्गच्या शिवारात शेतातील रात्रीच्या सुसाट्याचा वादळ वाऱ्याच्या व विजाचा कडकडाटा सह खुप मोठा प्रमाणात पाऊसाने थैमान घातले आसुन शहरातील राष्ट्रीय हायवेवर मोठ मोठी झाडे उखडुन कोसळली हा प्रकार रात्री २ ते २:३० दरम्यान झला

नळदुर्ग येथील संगीता दयानंद बनसोडे विधवा शेतकरी महिला आसुन त्यांच्या शेतात दोन हनम्या व सर्जा नावाच्या बैलांची जोडी होती त्या बैल जोडीचा विज पडुन जागीच मृत्यू झाला आहे याची अंदाजा किमती २ लाखांच्या पुढे होती संगीता दयानंद बनसोडे ही पिडीत विधवा महिलां आसल्याने शासनाने

**शेजारी प्रकाश कोकणे हे शेतात राहातात या शेतकऱ्याने विजेचा खुप मेठा कडकडाट झाला मोठा आवाज आल्याने या बैलांचा वीज पडून मृत्यू झाले असल्याचे सांगितले**

पंचनामा करून तात्काळ मदत द्यावी आशी मागणी जोर धरत आसुन शासनाने या पिड़ीत महिला शेतकऱ्याकडे लक्ष देऊन शेतकऱ्याना तात्काळ मदत माळावी या साठी प्रयत्न करणे गरजेचे आहे घटना स्थळाचा पंचनामा मंडलाधिकारी जयंत गायकवाड तलाठी व्ही व्ही वायचाळ कर्मचारी फुलारी यानी घटनास्थळी भेट दिली आसुन देऊन पंचनामा झाला आसल्याचे सांगण्यात आले





# रामा नारायण बेडक्याळे यांच्याकडून बौद्ध समाजाला स्वयंपाकासाठी भांडी सप्रेम भेट

**पत्रकार नामदेव निर्मळे**

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे रामा नारायण बेडक्याळे यांनी स्वतः टाकळीवाडी येथील स्वखर्चाने बौद्ध समाजाला स्वयंपाकासाठी भांडी भेट देण्यात आली.

नेहमी यांचा सामाजिक कार्यात हातभार असतो. सामाजिक बांधिलकी आतापर्यंत यांनी जपत आलेली आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी ही भांडी देण्यात आली. जवळजवळ ३५०००/- हजार रुपयाची भांडी आहेत. नेहमी गावातील सामाजिक कार्यात यांचे मोठे योगदान आहे. अन्नदान असो किंवा देणगी स्वरूपात असो नेहमी हातभार लावत असतात. बौद्ध समाजाकडून यांचे कौतुक होत आहे. व यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी समस्त बौद्ध परिवार उपस्थितीत होता.

# चैत्री एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची नित्य पूजा संपन्न

पंढरपूर /प्रतिनिधीः चैत्री शुद्ध कामदा एकादशी निमित्त मंदिर समितीच्या वतीने श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेची नित्यपूजा संपन्न झाली. श्री विठ्ठलाची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांनी, तर रुक्मिणी मातेची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प प्रकाश महाराज जंवजाळ यांनी केली.

वारकरी संप्रदायातील महत्त्वाची वारीपैकी चैत्री वारीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या गर्भगृहाचे संवर्धन करण्याचे काम सुरू असल्याने भाविकांना मुख दर्शन सुरु ठेवण्यात आले आहे. चैत्री एकादशीला भाविकांना सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदीर समितीच्यावतीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून, समितीच्या वतीने दर्शनरांगेत व दर्शन मंडपात, शुध्द पिण्याचे पाणी, शौचालये, लाइव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दर्शनरांग, दर्शनमंडप, मंदिर व मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे.

श्रीच्या गर्भगृह संवर्धन कामांची पाहणी काम वेळेत पूर्ण करण्याच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सूचना

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या गर्भगृहाचे संवर्धन करण्याचे काम सुरू असून, सदर ठिकाणच्या कामांची मंदीर समितीच्या सर्व सदस्यांनी पाहणी केली. यावेळी संबधित ठेकेदाराने नेमून दिलेल्या वेळेत दर्जेदार काम करावे. तसेच पुरातत्व विभागाने व संबंधित ठेकेदाराने यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ वाढवावे अशा सूचना सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिल्या.



तदनंतर आराखड्यातील कामासंदर्भात सह अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ९.३० वाजता मंदिर कार्यालयात सभा संपन्न झाली. या सभेस सदस्या शकुंतला नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, दूरदृष्यप्रणालीद्वारे डॉ. दिनेशकुमार कदम, ह.भ.प.भास्करगिरी महाराज, भागवतभूषण अतुलशास्त्री भगरे गुरुजी, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, विभाग प्रमुख बलभीम पावले, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे व कामाचे ठेकेदार उपस्थित होते.

या वेळी श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचा गाभारा तसेच सोळखांबी येथील सर्व लाकडी दरवाजांना देणगीदारांमार्फत चांदी लावणे. तसेच विठ्ठल सभा मंडप येथील संवर्धनाचे काम आषाढी यात्रे पूर्वी पूर्ण करणे. याशिवाय, दर्शन रांगेतील कायमस्वरूपी उभारण्यात आलेल्या ४ पत्राशेडचे नूतनीकरण करणे, श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे विद्युत व्यवस्थेसाठी सोलर पॅनल बसवणे इत्यादी निर्णय घेण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.